महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- ७७७ दिनांक :- ५-३-२४

माहिती अधिकार

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०४/०३/२०२४

१.अपिलकर्ता
श्री.चंद्रकांत संभा भिसे
राहणार :- २/२१३, मनपा इमारत, प्रथेजा सिटी मागे
वडगाव बु, पुणे-४११०४१.

२.जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
पुणे महानगरपालिका.

श्री.चंद्रकांत संभा भिसे
विरूध्द
**जनमाहिती अधिकारी** तथा अधिक्षक, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

उप आयुक्त सामान्य प्रशासन कार्यालयाकडून अपिलकर्ता श्री.चंद्रकांत संभा भिसे यांचा अपील अर्ज जा.क्र. ११६२९ दिनांक २५/१/२०२४ अन्वये कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील आ.क्र. ८३०१ दिनांक ३०/१/२०२४ अन्वये प्राप्त झाला. तथापि सदर पत्रासोबत अपिलार्थी यांचा मूळ अर्ज जोडलेला नसल्याने कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील जा.क्र. ७०१६ दिनांक ६/२/२०२४ अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग यांना पत्र पाठविण्यात आले.

तदनंतर उप आयुक्त सामान्य प्रशासन कार्यालय कडून जा.क्र. ९९७० दिनांक १८/१२/२०२३ रोजीचा अर्ज कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील आ.क्र. ८५४७ दिनांक ८/२/२०२४ अन्वये अपिलार्थी यांचा मूळ अर्ज प्राप्त झाला.

सदर मूळ अर्जामध्ये अर्जदार यांनी पुढील प्रमाणे माहिती विचारलेली आहे "कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडे कनिष्ठ लिपिक हुद्याचे कर्मचारी असताना असी. मोकादम वेतन लेखनिक म्हणून काम का करतो. सदरचा मोकादम कुणाच्या आदेशाने लिपिक टंकलेखक म्हणून स्वाक्षरी करतो त्या आदेशाची साक्षांकित प्रत मिळावी."

कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जात विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती जा.क्र. ७४३४ दिनांक २६/२/२०२४ अन्वये अर्जदार यांना रजिस्टर ए.डी. ने पाठविली तसेच दि. २८/२/२०२४ रोजी हातोहात सुद्धा देण्यात आली.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला आहे. सबब मूळ अर्ज मागवून घेण्यात आला आहे. मूळ अर्ज प्रत्यक्ष प्राप्त आ. ८५४७ दिनांक ८२०२४/२/ | ८/३/२०२४ | जा.क्र. ७४३४ दि. २६/२/२०२४ | निरंक | २६/२/२०२४ |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री.चंद्रकांत भिसे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– "दि. १३/१२/२०२३ रोजीचा माहिती अधिकार "

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| २६/०३/२०२२ | प्रत्यक्ष प्राप्त ८३०१ दिनांक ३०/१/२०२४ | मुदतीपूर्व दाखल झाले आहे. | - | दि. २६/०२/२०२४ व दि.१/३/२०२४ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ४/०३/२०२२ रोजी दुपारी ११.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडे कनिष्ठ लिपिक हुद्याचे कर्मचारी असताना असी. मोकादम वेतन लेखनिक म्हणून काम का करतो. सदरचा मोकादम कुणाच्या आदेशाने लिपिक टंकलेखक म्हणून स्वाक्षरी करतो त्या आदेशाची साक्षांकित प्रत मिळावी. | कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जात विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती जा.क्र.७४३४ दि. २६/२/२०२४ अन्वये अर्जदार श्री. भिसे यांना उपलब्ध करून दिली आहे. तसेच दि. २९/२/२०२४ रोजी हातोहात सुद्धा दिली आहे. |

## विवेचन

कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडील जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जात विचारले प्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती जा.क्र. ७४३४ दि. २६/२/२०२४ अन्वये अर्जदार यांना माहिती उपलब्ध करून दिली आहे तसेच अंशत: माहिती हि प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे सांगितले तसेच आपले कार्यालयाकडील जा.क्र. ७४३४ दि. २६/२/२०२४ अन्वये पाठविलेली माहिती मिळाली आहे असे अर्जदार श्री. भिसे यांनी सुनावणी दरम्यान सांगितले.

## -: आदेश :-

अर्जदार श्री. भिसे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जात नमूद केलेप्रमाणे इकडील कार्यालयाकडील उपलब्ध माहिती मा.जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी अर्जदार श्री. भिसे यांना उपलब्ध करून दिली आहे.

तसेच प्रश्नार्थक माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी नुसार अर्जदार श्री. भिसे यांना कळविण्यात यावे.

सबब माहिती मिळालेली असल्याने सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

(हेमंत किरुळकर)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ४/०३/२०२४,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-

१. श्री.चंद्रकांत संभा भिसे
राहणार :- २/२१३, मनपा इमारत, प्रथेजा सिटी मागे
वडगाव बु, पुणे-४११०४१.

२. जन माहिती अधिकारी तथा,
अधिक्षक, कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......